03 JAN 2023 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


जनार्दन वाघमारे : विद्यापीठात विशेष टपालाचे प्रकाशन

# महर्षी शिंदे यांच्याकडून समाजाला वैश्विक दृष्टी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या विचारकार्यातून समाजाला वैश्विक दृष्टी दिली, असे गौरवोद्गार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. जनार्दन वाघमारे यांनी सोमवारी येथे काढले. छत्रपती शाहू महाराज आणि गोव्याचे टपाल विभागाचे पोस्टमास्तर जायभाये यांच्या हस्ते महर्षी शिंदे यांच्या नावच्या विशेष टपालाचे प्रकाशन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाघमारे बोलत होते.

डॉ. वाघमारे म्हणाले, महर्षींनी सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केला. यातून समाजाला धर्मचिकित्सेची गरज आहे. भारतीय टपाल विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्यातर्फे हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. शाहू छत्रपती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, टपाल विभागाचे अर्जुन इंगळे उपस्थित होते.



महर्षि विठ्ठल रामजी शिंदे शताब्दी स्वर्ण जयंती वर्ष 2022-23
Maharshi Vitthal Ramji Shinde : 150th Birth Anniversary Year 2022-23

**शिवाजी विद्यापीठात सोमवारी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावे टपाल पाकिटाचे अनावरण करण्यात आले.**

गोवा विभागाचे पोस्टमास्तर आर. के. जायभाये म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महर्षी शिंदे यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे, म्हणून त्यांचा टपाल विभाग गौरव करीत आहे. देशातील अनेक महनीय व्यक्ती, स्थळे, वनस्पती, प्राणी, पक्षी यांच्यासंदर्भात विशेष संदेश देण्यासाठी खात्याने वेळोवेळी अशी पाकिटे काढली आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे अध्यासन कार्यरत आहे. समाज परिवर्तनासाठी महर्षी शिंदे यांच्या विचारांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अध्यासन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

## प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे : विद्यापीठात म. शिंदे यांच्या पोस्ट कव्हरचे अनावरण


# महर्षी शिंदेंनी दिली वैश्विकदृष्टी

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या विचारकार्यातून समाजाला वैश्विक दृष्टी दिली,' असे गौरवोद्गार नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी काढले. भारतीय पोस्ट विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी शिंदे यांचे विशेष आवरण (कव्हर) आज विद्यापीठात प्रकाशित केले. या वेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. वाघमारे म्हणाले, "महर्षी शिंदेंसारख्या महान व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या कार्याची समाजाने उपेक्षा केली. त्यांच्या कार्याची आज उजळणी करणे गरजेचे आहे. महर्षींनी सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केला. या अभ्यासातून समाजाला धर्मचिकित्सेची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी आपल्या कार्यातून वैश्विक दृष्टी दिली."

गोवा विभागाचे (पणजी)चे पोस्टमास्तर जनरल आर. के. जायभाये म्हणाले, "देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या महर्षी शिंदे यांच्या कार्याच्या गौरवार्थ भारतीय टपाल विभाग हे विशेष आवरण




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महर्षी वि.रा. शिंदे यांच्या विशेष पोस्ट कव्हरचे अनावरण सोमवारी (ता.३) करण्यात आले. समारंभप्रसंगी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज व पोस्टमास्तर आर. के. जायभाये. (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, अर्जुन इंगळे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रा. जनार्दन वाघमारे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

प्रकाशित करीत आहे. देशातील अनेक महनीय व्यक्ती, स्थळे, वनस्पती, प्राणी, पक्षी यांच्यासंदर्भात विशेष संदेश देण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी अशी आवरणे काढली असून जगभरातील संग्राहकांनी त्यांचा संग्रह केला आहे."

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "म. शिंदे यांच्या कार्याचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे अध्यासन कार्यरत आहे. समाज परिवर्तनासाठी म. शिंदे यांच्या विचारांची गरज आहे." श्रीमंत छत्रपती शाहू महाराज आणि जायभाये यांच्या हस्ते म. शिंदे यांचे विशेष आवरणाचा प्रकाशन समारंभ झाला. या वेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, पोस्ट विभागाचे अर्जुन इंगळे उपस्थित होते.

अध्यासन समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक यांनी केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, कोल्हापूर पोस्ट विभागाचे अधिकारी- कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

पुण्यनगरी



# महर्षी शिंदे यांच्याकडून समाजाला वैश्विक दृष्टी

## प्रा. जनार्दन वाघमारे, विद्यापीठात विशेष पोस्ट कव्हरचे प्रकाशन

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या विचारकार्यातून समाजाला वैश्विक दृष्टी दिली, असे उद्गार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. जनार्दन वाघमारे यांनी काढले.

भारतीय पोस्ट विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी शिंदे यांचे विशेष आवरण (कव्हर) विद्यापीठात प्रकाशित करण्यात आले, त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज प्रमुख उपस्थित होते.

गोवा विभागाचे (पणजी) पोस्टमास्तर आर. के. जायभाये, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मंचावर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, पोस्ट विभागाचे अर्जुन इंगळे, जयसिंगराव पवार, डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अरुण शिंदे आदी उपस्थित होते.

03 JAN 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी विठ्ठल शिंदेंचे कार्य नव्या पिढीने आत्मसात करावे

## डॉ. जर्नादन वाघमारे : पोस्टाने तयार केलेल्या महर्षींच्या विशेष आवरण(कव्हर)चे श्रीमंत शाहूंच्या हस्ते प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

समाजाला वैश्विक दृष्टी देण्याचे महानकार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या विचारधारेतून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. नव्या पिढीने त्यांचे कार्य आत्मसात करावे, असे प्रतिपादन नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. जनार्दन वाघमारे यांनी आज येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र व भारतीय पोस्ट विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी शिंदे यांचे विशेष आवरण (कव्हर)च्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले श्रीमंत शाहू छत्रपती व गोवा विभागाचे (पणजी) पोस्टमास्तर जनरल आर. के. जायभाये यांच्या हस्ते पोस्ट विभागाने तयार केलेल्या महर्षींच्या विशेष आवरणचे (कव्हर) प्रकाशन झाले. डॉ. वाघमारे म्हणाले की, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सारख्या महान व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या कार्याची समाजाने उपेक्षा केली आहे. महर्षींनी सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केला.

आर. के. जायभाये म्हणाले, महर्षी शिंदे यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या योगदानाच्या गौरवार्थ भारतीय टपाल विभाग हे विशेष आवरण प्रकाशित केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांचे भाषण झाले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील पोस्ट विभागाचे अर्जुन इंगळे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, साहित्यिक डॉ. राजन गवस, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विशेष पोस्ट कव्हरचे प्रकाशन करताना श्रीमंत शाहू छत्रपती, डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, आर. के. जायभाये, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. मोरे, अर्जुन इंगळे व प्रा. वाघमारे.**

03 JAN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठ्यांचा इतिहास आता आंतरराष्ट्रीय पातळीवर

## डॉ. उमेश कदम : विद्यापीठाचा इतिहास संशोधन परिषदेसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे मराठ्यांचा स्थानिक इतिहास राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे (आयसीएचआर) सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी केले.

सामंजस्य करारावर डॉ. कदम यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.



कोल्हापूर : सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना डॉ. उमेश कदम आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

डॉ. कदम म्हणाले, मराठा इतिहास हा भारताचा मूळ इतिहास आहे. हा इतिहास परकीयांनी आपल्याला सांगितला. या करारांतर्गत या इतिहासाचे संशोधन करण्यात येणार आहे. त्याचे डिजिटलायझेशन करून तो सर्वांना उपलब्ध करून देण्यात येईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत होणारा विद्यापीठाचा हा पहिला सामंजस्य करार आहे. मराठा इतिहास जागतिक स्तरावर नेण्याची ही खूप महत्त्वाची संधी आहे. त्यासाठी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि मराठा इतिहास संशोधन केंद्र यांच्या माध्यमातून ऐतिहासिक साधने व दस्तावेज संस्थेला उपलब्ध करून देण्यात येतील.

कार्यक्रमास मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. दत्ता मचाले आदी उपस्थित होते. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

03 JAN 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठ्यांचा स्थानिक इतिहास जाणार आंतरराष्ट्रीय पातळीवर : उमेश कदम

## सामंजस्य करार : विद्यापीठाच्या सोबतीला भारतीय इतिहास संशोधन परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्याने मराठ्यांचा स्थानिक इतिहास आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाची नववर्षाची सुरुवात अभिनव सामंजस्य कराराच्या कार्यक्रमाने झाली. करारावर डॉ. कदम यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केली. शिवाजी विद्यापीठ या आपल्या मातृसंस्थेसमवेत हा महत्त्वपूर्ण करार करताना अभिमान वाटत असल्याचे डॉ. कदम म्हणाले.



शिवाजी विद्यापीठ व भारतीय इतिहास संशोधन परिषदेने सोमवारी सामंजस्य कराराचे उमेश कदम व कुलगुरु दिगंबर शिर्के यांच्यात हस्तांतरण केले. यावेळी नीलांबरी जगताप, प्रमोद पाटील, अवनीश पाटील व विलास शिंदे उपस्थित होते.

मराठा इतिहास परकीयांनी सांगितला. तथापि, मोडी, मराठीसह स्थानिक भाषांमध्येही पुष्कळ इतिहास दडला आहे. त्याचे संशोधन होणार आहे. त्यांचे डिजिटलायझेशन करून सर्वांना उपलब्ध होईल. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने फेब्रुवारी अखेरपर्यंत स्वातंत्र्ययोद्ध्यांविषयी तीन, मराठा इतिहास आणि स्थानिक स्रोत-साधने याबद्दलही दहा व्याख्याने होणार आहेत. सामाजिक शास्त्रे, विज्ञान व तंत्रज्ञान, भाषा, अर्थशास्त्र या विद्याशाखांशी निगडित प्रकल्पही हाती घेण्यात येतील. काही महत्त्वाच्या मराठी ग्रंथांच्या अनुवादाचेही प्रस्ताव सादर करण्याची संधी असेल. या उपक्रमांसाठी १५ लाखांची तरतूदही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत हा पहिला करार आहे. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि मराठा इतिहास संशोधन केंद्राच्या माध्यमातून ऐतिहासिक साधने व दस्तावेज संस्थेला उपलब्ध करून दिले जातील.

नवी दिल्ली आणि बंगळुरू येथील संशोधन परिषदेचे सदस्य ऑनलाईन सहभागी झाले, तर मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. दत्ता मचाले उपस्थित होते. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

03 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा इतिहासाचे पैलू अभ्यासणार

## इतिहास संशोधन परिषदेचा विद्यापीठाबरोबर करार

कोल्हापूर, ता. २ : 'भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे मराठ्यांचा स्थानिक इतिहास राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याचा मार्ग खुला झाला आहे. या करारामुळे मराठा इतिहासातील अनेक पैलूंवर सखोल अभ्यास करता येणार आहे,' असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे (आयसीएचआर) सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय इतिहास संशोधन परिषद यांच्यात आज सामंजस्य करार झाला. यावेळी ते बोलत होते. या सामंजस्य करारावर डॉ. कदम यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या.



**कोल्हापूर : सामंजस्य कराराचे हस्तांतरण परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यामध्ये सोमवारी झाले. यावेळी (डावीकडून) डॉ. नीलांबरी जगताप, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अवनीश पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे.**

यावेळी डॉ. कदम म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. या संस्थेसमवेत हा महत्त्वपूर्ण करार करीत असताना अभिमान वाटतो. मराठा इतिहास हा भारताचा मूळ इतिहास आहे. मात्र, तो परकियांनी आपल्याला सांगितला. मोडी, मराठीसह विविध स्थानिक भाषांमध्ये अद्यापही पुष्कळ इतिहास दडलेला आहे. या करारांतर्गत या इतिहासाचे संशोधन करण्यात येणार आहे. मराठा इतिहास आणि स्थानिक स्रोत-साधने या अनुषंगानेही दहा व्याख्याने आयोजित करण्यात येतील. काही महत्त्वाच्या मराठी ग्रंथांचा अनुवाद करून त्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर न्यावयाचे असेल, तर तसे प्रस्ताव सादर करण्याचीही संधी करारामध्ये असेल. या उपक्रमांसाठी प्राथमिक टप्प्यावर १५ लाख रुपयांची तरतूदही करण्यात येईल.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत होणारा विद्यापीठाचा हा पहिला सामंजस्य करार आहे. मराठा इतिहास जागतिक स्तरावर नेण्याची ही खूप महत्त्वाची संधी आहे.'

यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. दत्ता मचाले आदी उपस्थित होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठाच्या १४ परीक्षांना प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : हिवाळी सत्रातील शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अशा चौदा अभ्यासक्रमाच्या परीक्षा सोमवारी महाविद्यालये आणि अधिविभागात सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत. कोरोनानंतर अडीच वर्षांनंतर प्रथमच ऑफलाइन आणि वर्णनात्मक स्वरूपात या परीक्षा घेण्यात येत आहेत. विविध अभ्यासक्रमांना कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील सुमारे दोन लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत. फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत परीक्षा सुरू राहतील. सकाळी साडेदहा ते दुपारी दीड आणि दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच अशा दोन सत्रांमध्ये परीक्षा आहेत हिवाळी सत्रात एकूण ७५० परीक्षा होणार आहेत.

पुण्यनगरी

# हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षांना सोमवारपासून सुरुवात झाली. ऑफलाईन पद्धतीने या परीक्षा घेण्यात येत आहेत. पहिल्या दिवशी एकूण १७ अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षा सुरळीत पार पडल्याची माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली.

Times of India

# SUK's winter exams starts in offline mode

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The winter semester examination for graduate and post-graduate courses began at the Shivaji University, Kolhapur (SUK) from Monday in an offline descriptive format.

The university exams are being conducted offline after a around two-and-a half years due to the Covid pandemic. Around 2.5 lakh from Kolhapur, Sangli and Satara districts are appearing for these exams.

Dr Ajitsinh Jadhav, director of SUK Board of Examinations and Evaluation, said, "The exams began at 273 exam centres in an offline descriptive format from Monday. These exams will be held in two sessions from 10:30am to 1:30pm and 2:30pm to 5:30pm. Preparation for sending question papers through the SRPD system is in place. The answer sheet checking workshops have been conducted for teachers and staff after determining the cluster cap (collective center) for inspection. The exams will continue till the last week of February."

On Monday, examinations for vocational and non-vocational courses in nursing, sustainable agriculture management, agriculture, automobile, B.Com, food processing technology, printing and publishing among others were conducted smoothly.

03 JAN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जल, जंगल आणि जमिनीचा हवा समतोल

**मानवाचे कष्ट कमी करण्यासाठी, त्रास कमी होण्यासाठी निर्माण केल्या जाणाऱ्या सुविधांचा विकास म्हणजे शाश्वत विकास, ही संकल्पना बहुतांश लोकांच्या मनात आहे. अशा विकासात निसर्गाचे होणारे नुकसान, त्याचा पुढील पिढीवर होणारा परिणाम याचा कोणी विचार करत नाही. २०२२ हे वर्ष युनेस्कोने 'शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' या संकल्पनेवर आधारित उपक्रमांचे आयोजन करून साजरे करण्याचे आवाहन केले. यानुसार निसर्गातील साधनसंपत्ती सर्व जीवांसाठी आहे, याचा विचार करून त्यांचा वापर करण्याची गरज आहे.**



- डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

कोरोनाचे संकट हे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून उपकारक म्हणायला हवे. या संकटकाळात लॉकडाऊन झाल्याने आपण निसर्गाची कशी हानी करत आहोत, हे किमान जाणवले. तसेच आज घडणाऱ्या अनेक गोष्टींमागे आपले निसर्गाला हानी पोहोचवणारे वर्तन असल्याचेही सिद्ध झाले. २०२० च्या मार्चमध्ये उत्तर ध्रुवावरील ओझोन थराला दहा हजार चौरस किलोमीटरचे छिद्र पडले होते. उत्तर ध्रुवावर अशा प्रकारे छिद्र पडण्याची पहिलीच घटना होती. हे छिद्र असेच राहिले असते, तर सौरप्रारणातील अतिनील किरणे पृथ्वीवर आली असती. उत्तर ध्रुव आणि इतर ठिकाणचाही बर्फ वितळला असता. पृथ्वीवर अभूतपूर्व जलसंकट आले असते. मात्र, जगभरातील सर्व प्रदूषण करणाऱ्या यंत्रणा लॉकडाऊनमुळे बंद होत्या. प्रदूषके वातावरणात न मिसळल्याने, हवेतील ओझोन थराला पडलेले छिद्र बुजले. मात्र, सर्व काही पूर्वीसारखे सुरू असते, लॉकडाऊन नसते, तर हे छिद्र बुजले नसते.

दुसरीकडे, अरबी समुद्रामध्ये वादळे कधीच येऊ शकत नाहीत, असे सांगितले जात असतानाही अरबी समुद्रात सतरा महिन्यांत तीन वादळे आली. मागील वर्षी भारतासह अनेक देशांमध्ये पुराने थैमान घातले. जर्मनी, भारत आणि चीनमध्ये पुराने हाहाकार माजवला. चीनमधील पुरात सहा हजारपेक्षा जास्त कुटुंबांचे स्थलांतर करावे लागले. लाखो कुटुंबांच्या, लाखो हेक्टर जमिनीवर पुराचे पाणी पसरले होते. भारतात जुलैमध्ये मोठा पाऊस झाला. पश्चिम महाराष्ट्राला सर्वप्रथम पुराने वेढले. त्यानंतर उत्तर भारतात पुराने कहर केला.

महाराष्ट्रातील पुराचा सर्वाधिक फटका कोकणासह कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांना बसला. कोकणातील चिपळूण शहर पुरामध्ये पूर्ण बुडाले. कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यातील एकाही धरणातून पाणी न सोडताही पूर आला होता. सह्याद्रीच्या पर्वतरांगांत अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. भक्कमपणाचा दाखला म्हणून सह्याद्रीचा दाखला देण्यात येत असे. त्याच सह्याद्रीच्या कडा अनेक ठिकाणी ढासळल्या. दरड कोसळल्याने शंभरपेक्षा जास्त लोकांचे जीव गेले. पन्हाळ्याची तटबंदी कोसळली. विशाळगडावरही भेगा पडल्या. पूर्वी माळीण गावातही दरड कोसळून गावाचे अस्तित्वच पुसले गेले.

२०२२ मध्ये उलट घडले आहे. पश्चिम महाराष्ट्रात पाऊस समाधानकारक असला, तरी पुराचे थैमान नाही. चीनमध्ये मात्र अर्थव्यवस्थेला धक्का पोहोचवणारा दुष्काळ पडला आहे. पाकिस्तानमध्येही पुराने थैमान घातले आहे. महाराष्ट्र आणि भारतातही यावर्षी मोठ्या प्रमाणात दरडी कोसळल्या. या सर्व गोष्टींमागे मानवाने निसर्गात केलेला अविचारी हस्तक्षेप हे कारण आहे. या सर्वांचे खापर निसर्गाच्या लहरीपणावर टाकतो. असा निसर्ग पूर्वी वागलाच नाही, असे नाही. मात्र, पूर्वी अशी अपरिमित हानी झाली नव्हती.

पश्चिम महाराष्ट्रात १९८९ मध्ये आणि नंतर २००५ मध्ये पूर आला होता. त्यानंतर २०१९ पाठोपाठ २०२१ मध्ये पूर आला. या पुरामुळे आणि वाढत्या नुकसानीमुळे पूर आणि नैसर्गिक आपत्तींचा नव्याने विचार करण्यात येऊ लागला. जुलै २०२१ मध्ये राष्ट्रसंघाच्या 'इंटरगव्हर्मेंटल पॅनिल फॉर क्लायमेट चेंज' या संस्थेने आपला सहावा अहवाल सादर केला. त्यानुसार हिंद महासागरातील समुद्राचे तापमान वेगाने वाढत आहे. यामुळे अरबी समुद्रात वारंवार वादळे येणार, ढगफुटी किंवा कमी वेळात अतिवृष्टी आणि पूर परिस्थिती वारंवार उद्‌भवणार, तसेच दक्षिण भारतात पावसाचे प्रमाण ४० टक्के वाढण्याचे संकेत दिले आहेत. यावर्षी असे घडत आहे. महाराष्ट्रात लातूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे येथे ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. काही भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याचे अनुमानही नमूद आहे. तापमानवाढीमुळे दक्षिण मुंबईचा बहुतांश भाग, कोकण किनारपट्टीवरील अनेक गावांसह पाण्याखाली जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यावर्षीचा चीनमधील दुष्काळही या अहवालातील नमूद अनुमानानुसार आहे.

मानवाकडून होणारा अविचारी पद्धतीने विकास या बदलत्या निसर्ग चक्राला कारणीभूत आहे. औद्योगिक प्रगतीची सुरुवात झाल्यापासून आजतागायत 'ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर म्हणजे विकास,' असे सूत्र जगाने मान्य केले. ऊर्जा मिळवण्यासाठी खनिज तेले आणि कोळशाचा प्रचंड वापर करण्यात येऊ लागला. त्यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषणकारी घटक वातावरणात मिसळू लागले. या प्रदूषकांची सौरऊर्जा शोषण करण्याची क्षमता मोठी असते. परिणामी, जागतिक पातळीवर तापमान वाढ होते. अतिरेकी ऊर्जेच्या वापरातून होणारे प्रदूषण, त्यामुळे वाढणारे तापमान आणि त्यांचा वातावरणावर होणाऱ्या परिणामाची जाणीव संशोधकांना झाली. १९६९ मध्ये मायकेल ओपेनहायमर या संशोधकाने सर्वप्रथम 'मानवाच्या अविचारी विकासाने पृथ्वीवरील निसर्गाचे नुकसान होते,' हे सांगितले. ओपेनहायमर यांच्या इशाऱ्यानंतर दहा वर्षांनी १९७९ मध्ये जागतिक तापमान वाढीसंदर्भात अधिकृत चर्चा सुरू झाली. जिनिव्हा येथे पहिली जागतिक परिषद झाली. त्यानंतर १९९०, २००९ मध्येही अशा परिषदा झाल्या. या सर्व परिषदांमध्ये सर्वांनीच जागतिक तापमान वाढ थांबली पाहिजे, प्रदूषण कमी झाले पाहिजे, खनिज तेलाचा वापर नियंत्रित झाला पाहिजे, असे मान्य केले. मात्र, अंमलबजावणीची वेळ आल्यानंतर, 'प्रदूषण कमी करण्याची जबाबदारी दुसऱ्याची,' अशी भूमिका घेत आले. अमेरिकेसारख्या प्रगत देशांनी, विकसनशील देशांनी खनिज तेल आणि दगडी कोळशाचा वापर कमी करावा, असे सुचवले. विकसनशील देशांनी 'विकसित देशच याला जबाबदार आहेत, त्यांनीच याची अंमलबजावणी करावी,' असा सूर आळवला. प्रश्नतसाच राहिला. उलट खनिज तेलाचा वापर दिवसेंदिवस वाढला. जागतिक तापमानवाढ होतच राहिली. त्याचेच परिणाम वसुंधरा भोगत असल्याचे, संशोधक सांगतात. मात्र 'ऐकणार कोण?' हा प्रश्न आहे.

खनिज तेलाचा अमर्याद वापर थांबला पाहिजे, हे सर्वांना मान्य आहे. मात्र तसे होत नाही. तथापि, जागतिक तापमान वाढीचे आणि निसर्ग चक्रावर अनिष्ट परिणाम होण्याचे, हे एकमेव कारण नाही. अविचाराने होत असलेला सर्वच क्षेत्रांतील विकास सर्वात मोठा धोका बनला आहे. त्या दृष्टीने नैसर्गिक संकटांकडे पाहायला हवे. कोल्हापूर, सांगली भागांत वारंवार येणारे पूर, त्यांची वाढती तीव्रता ही प्रामुख्याने अतिक्रमणांची देणगी आहे. (पान ७ वर)

03 JAN 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जल, जंगल आणि जमिनीचा हवा समतोल

(पान ४ वरून) अतिवृष्टी तर जागतिक तापमानवाढीची देणगी आहे. काही तासांत, एक दोन दिवसांत अतिवृष्टी होणे हा तापमान वाढीचा परिणाम आहे. जागतिक तापमान वाढीचा प्रश्न चर्चेत येण्यापूर्वीही अतिवृष्टी होत असे. मात्र, आता त्याची वारंवारिता वाढली आहे. ठिकाणांची घनताही वाढली आहे. अतिपाऊस पडला, की पूर येणे स्वाभाविक आहे. मात्र, हा पूर पाऊस थांबताच न ओसरणे, हे अनैसर्गिक आहे. पूर न ओसरण्यामागे अनेक महामार्गांचे चुकीचे बांधकाम हे महत्त्वाचे कारण असल्याचे आज तज्ज्ञ सांगत आहेत. यातूनच महामार्गांचे बांधकाम नव्याने करण्याची मागणी जोर धरत आहे. महामार्गाच्या रचनेत बदल करण्यासाठी येणारा खर्च हा वारंवार येणाऱ्या पुरांमुळे होणाऱ्या हानीपेक्षा कितीतरी कमी आहे. त्यामुळे या गोष्टीची अंमलबजावणी तातडीने होण्याची गरज आहे.

मानवाला वेग हवा आहे. कमी खर्चात, जास्त वेगाने गाड्या जाव्यात म्हणून मार्गातील चढ-उतार कमी करण्यासाठी डोंगराचा मोठा भाग फोडण्यात येतो. त्यामधून रस्ता काढला जातो. दोन्ही बाजूला त्या टेकडीचे भाग तसेच उभे असतात. ते पडू नयेत, यासाठी काही जुजबी उपाययोजना करण्यात येतात. हे डोंगर फोडताना पोकलेंडसारख्या अजस्र यंत्राचा, व्हायब्रेटिंग ब्रेकरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. अशा यंत्रांच्या कंपनांमुळे न फोडल्या जाणाऱ्या डोंगरांचा भाग सुटा होतो. त्याच्या विविध थरांतील पकड ढिली होते. तर काही ठिकाणी खड्डे बुजवण्यासाठी इतर ठिकाणचे डोंगर, टेकड्या फोडून दगड, माती आणि मुरुम आणून टाकला जातो. याची बांधणी, यावर भार देऊन घट्ट बसवण्याचे काम अजस्र यंत्रांच्या साहाय्याने होते. हे काम करताना पर्यवेक्षण किती काळजीपूर्वक होते, हे संबंधित अधिकाऱ्यांना माहीत! ते पूर्ण क्षमतेने होते, असे गृहीत धरले तरी उभ्या असणाऱ्या डोंगरांतील माती आणि दगडगोट्यांमध्ये आलेला सैलपणा कमी करण्यासाठी कोणतेही प्रयत्न होत नाहीत. मुळात त्याचा विचारच कोणी करत नाही.

भारतातील अनेक राज्यांत पुराच्या गंभीर होणाऱ्या संकटामागे महामार्गांचे बांधकाम होताना पुराच्या पाण्याला वाटा न ठेवणे कारणीभूत असल्याची चर्चा आता होते आहे. महामार्गाच्या बांधकाम तंत्रामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आता घेण्यात आला आहे. भविष्यात पूर तुंबण्याची ठिकाणे कमी होतील. मात्र, पुरासारख्या आपत्तीसाठी अतिवृष्टी आणि महामार्गांची बांधकामे केवळ हीच कारणे नाहीत. पुरासारखी आपत्ती भयानक ठरण्यामागे जमिनीची धूप हेही एक कारण आहे. जमिनीची धूपसुद्धा विविध कारणाने होत आहे.

पश्चिम घाटातच नव्हे, तर देशभर डोंगर संपवण्यामागे अनेक लोक लागले आहेत. हे अनेक दृष्टीने घातक आहे. डोंगराच्या नाशामागे महामार्गांचे बांधकाम हे पहिले कारण. बांधकामासाठी, रस्त्यासाठी खडी, दगडांची गरज भागवण्यासाठी, खनिजांसाठी डोंगर पोखरले जात आहेत.

झाडे तोडणे, त्यावरील माती अनियंत्रितपणे बाजूला खाणीच्या ठिकाणी सातत्याने आढळून येते. ही माती सुटी, सैल पडलेली असते. धूप होण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण आहे ते शेतीचे! लोकसंख्या जशी वाढत गेली, तसे जंगलाचे क्षेत्र कमी झाले. त्या जागेवर शेती करण्यात येऊ लागली. वाढत्या लोकसंख्येच्या पोटाची भूक भागवण्यासाठी हे आवश्यक असल्याचे समर्थन करण्यात येते. शेतातील पीक चांगले यावे म्हणून मशागत केली जाते. माती भुसभुशीत केली जाते. असे शेतीचे क्षेत्र पावसाळ्यात पिकाविना असेल, आणि त्या भागात अतिवृष्टी झाली, तर माती वाहून जाते. त्याचबरोबर पूर क्षेत्रात असणारी पीक पद्धतीही महत्त्वाची भूमिका पार पाडते. उसासारखी घनदाट आणि उंच वाढणारी पिके नदीपात्रात असल्यास पूर ओसरण्यास लागणारा वेळ वाढतो. आयआयटी मुंबईच्या संशोधकांनी २००५ मध्ये कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांत आलेल्या पुराच्या अभ्यासानंतर हा निष्कर्ष काढला आहे. खनिजांच्या, दगडांच्या खाणीमुळे सुटी झालेली माती जोरात येणाऱ्या पावसाबरोबर वाहून जाते. ती नदीच्या पात्रात येते. नदीच्या पात्रात ही गाळाची माती साचते. त्यामुळे नदीचे पात्र उथळ बनते. केवळ पात्रातून जाऊ शकणारे पाणीसुद्धा पात्राबाहेर पडते. पाण्याबरोबर आलेली माती उसासारख्या पिकामुळे अडकून राहते. मातीमुळे पात्र पसरट, उथळ होत असतानाच पडलेले पाणी नदी पात्राशेजारील सुपीक जमिनीतील पिके आणि कसदार माती वाहून नेते. शेतीचे अतोनात नुकसान होते. पुरांमुळे शेतीचे आणि शेतकऱ्यांचे होणारे नुकसान नेहमीचे झाले आहे.

खाणकाम करताना कसे करावे, सुटी माती कशी जपावी, ती वाहून जाऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, यासंदर्भात शासन निर्देश आहेत. मात्र, ते काटेकोरपणे पाळले जात नाहीत. त्यामुळे अनेक नद्यांच्या पात्रामध्ये वाळू नाही, तर केवळ मातीच असते. ज्या भागात वाळू आहे, त्या भागात वाळू तस्करी सुरू आहे. वाळूच्या अनिर्बंध उपशामुळे जमिनीत पाणी मुरणे थांबते. वाळू नदीत असणे, नदी जिवंत असण्याचे महत्त्वाचे लक्षण आहे. मात्र, हा थर संपवला जात आहे. वाळू प्रदूषण कमी करते, पाणी स्वच्छ ठेवते. वाळू पूर्णतः उपसली गेली, तर नदीपात्रातील जमीन उघडी पडते. त्यामुळे वाळूचा उपसा मर्यादित होणे आवश्यक आहे. त्यानुसारच शासनाकडून निविदा निघतात. मात्र मानवी हव्यास आणि स्वार्थ हा वाळू उपसा त्या मर्यादेत ठेवत नाही. अर्थात याचे परिणाम दीर्घकालीन होत आहेत आणि होत राहणार, हे कोणीच लक्षात घेत नाही.

नद्यांकाठची, समुद्राकाठची तोडली जाणारी झाडे, ही सुद्धा मोठी समस्या आहे. नदीकाठी असणाऱ्या शेताचे बांध आज बोडके झाले आहेत. त्यामुळे शेतातील गाळाची माती, नदीपात्रात येते. पृथ्वीवरील जीवसृष्टी अशीच ठेवायची असेल, तर 'जल, जंगल आणि जमीन यांचा समतोल' राखणे आवश्यक आहे. मात्र माणूस इंच-इंच भूमी कशी पिकवता येईल, याचा विचार करत आहे. यासाठी झाडांची कत्तल करीत सुटला आहे. एकीकडे दरवर्षी वृक्षारोपणाचे सोहळे साजरे करायचे आणि दुसरीकडे मोठमोठ्या झाडांच्या कत्तली करायच्या, असे दुटप्पी वागणे सुरू आहे.

पारंपरिक परिसंस्थांच्या नाशामुळे इतरही अनेक गोष्टी घडत आहेत. गवताळ, झाडांनी व्यापलेल्या डोंगरमाथ्यावर मोठ्या झाडांच्या बागा तयार झाल्या, तर ज्या भागात गवताळ आणि वृक्षराजींने झाकलेला भाग आहे, तो जास्त पाणी पकडून ठेवतो. तो भाग जड बनतो. वरचा भाग त्याच पद्धतीचा नसल्याने हा भाग सुटतो आणि दरडी कोसळतात. महामार्गांच्या बांधकामासाठीही अनेक झाडे तोडण्यात येतात. महामार्गाच्या आड येणारी माती काढून टाकली जाते. चढ खोदून बाजूला केले जातात. उतारावर भर घातली जाते. या कामासाठी अवजड यंत्रे वापरतात. या यंत्रांच्या हादऱ्याने कोकणासारख्या भागातील मृदा सैल होते. पाऊस पडला की उघडी जमीन पाण्याबरोबर मातीही नेते. माती सैल झालेल्या भागातून पाणी गेले, की भेगा रुंदावतात. अशा भागात रस्ते बांधताना मोठी आणि अवजड कंप करणारी यंत्रे न वापरता मनुष्यबळाचा वापर करून हळूवारपणे गरजेपुरत्या भागातील माती काढण्याची गरज असते. मात्र, मानवी बळाचा वापर करून असे मोठे प्रकल्प पूर्ण करावयाचे झाल्यास त्यासाठी खर्च आणि वेळ वाढतो. खर्च आणि वेळेची केलेली बचत पुढे मोठ्या विनाशाकडे घेऊन जाते.

प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असते, असा 'न्यूटनचा तिसरा सिद्धांत' सांगतो. हे केवळ बलाबाबत सत्य असणारे विधान नाही. निसर्गातील प्रत्येक गोष्टीला हा नियम लागू आहे. मानवाच्या अनियंत्रित वागण्याची अनियंत्रित प्रतिक्रिया येणारच. त्यामुळे निसर्गाच्या प्रतिक्रिया आल्यानंतर पुन्हा निसर्गालाच नावे ठेवणे, दोष देणे योग्य नाही. निसर्गातील साधनसंपत्ती ही केवळ मानवाची नाही. ती निसर्गातील सर्व घटकांची आहे. पाणी, जमीन, जंगल सर्व गोष्टींचा वापर सर्वांना करता आला पाहिजे. निसर्गातील सर्व घटक परस्परपूरक भूमिका पार पाडतात. निसर्गात एक अन्नसाखळी कार्यरत असते. यातील एक कडी तुटली, तर हे कार्य अपूर्ण राहते. म्हणून निसर्गस्नेही विकासाचा मार्ग पकडायला हवा.

